Literacy for a Billion

Movie: Aahuti
Year: 1992

Song: Japle Manat Gaane
Lyricist: Pravin Davane

जपले मनात गाणे
जपले मनात गाणे
छेडायला हवे का
शब्दात आज सारे
सांगायला हवे का
जपले मनात गाणे

भेटीतल्या क्षणांची
झाली फुले सुगंधी
भेटीतल्या क्षणांची
झाली फुले सुगंधी
आता मुक्या कळयांनी
आता मुक्या कळयांनी
उमलायला हवे का
शब्दात आज सारे
सांगायला हवे का
जपले मनात गाणे

सहवास अमृताचा
भिजवी क्षणाक्षणाला
सहवास अमृताचा
भिजवी क्षणाक्षणाला
आषाढ मेघ आता
आषाढ मेघ आता
बरसायला हवे का
शब्दात आज सारे
सांगायला हवे का
जपले मनात गाणे
छेडायला हवे का
जपले मनात गाणे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*